नि.दि.दा. क्र.८९/२०१३
संगिता वि. लहु भुसारे व इतर

## निशाणी क्र.१ खालील आदेश

वादी व त्यांच्या विधिज्ञांचा प्रथम सत्रामध्ये वारंवार पुकारा केला असता गैरहजर. त्यामुळे प्रकरण द्वितीय सत्रात ठेवण्यात आले. द्वितीय सत्रात देखील वादी व त्यांचे विधीज्ञ गैरहजर राहिले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसते की, दिनांक १८.११.२०२५ रोजीपासून वादी व त्यांचे विधीज्ञ सतत गैरहजर आहेत. वादीच्या वतीने कोणीही न्यायालयात हजर राहून प्रकरणात कोणतेही परिणामकारक पाऊल उचललेले नाही. प्रस्तुत प्रकरण हे वाटणी मिळण्यासाठी दाखल असून गेल्या १० वर्षांपेक्षा जास्त कालावधीपासून प्रलंबित असल्याचे लक्षात घेता असे दिसून येते की, वादींना प्रस्तुत प्रकरणामध्ये काहीच स्वारस्य उरलेले नाही. त्यामुळे कोणत्याही कार्यवाही अभावी सदर प्रकरण प्रलंबित ठेवणे न्यायोचीत होणार नाही. तरी देखील वाटणीचा दावा असल्याची बाब विचारात घेऊन एक अंतिम संधी म्हणून प्रस्तुत प्रकरणात पुढचा दिनांक देण्यात येत आहे व त्या दिवशी अशीच स्थिती राहिल्यास प्रकरणात योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. वादी व त्यांच्या विधिज्ञांना त्याबाबत नोटीस काढून अवगत करण्यात यावे. सबब, प्रकरण योग्य त्या आदेशासाठी ठेवण्यात येत आहे. सर्व संबंधितांनी याची गांभीर्याने नोंद घ्यावी. त्याप्रमाणे आदेश.

BHALCHANDRA RAWSAHEB ZENDE

Digitally signed by BHALCHANDRA RAWSAHEB ZENDE
Date: 2026.06.23 15:39:01 +0530

(भालचंद्र रा. झेंडे)

दिनांक : २३.०६.२०२६ — ३रे सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर),

ठिकाण : माढा — माढा, जि. सोलापूर.